* Non-registered bidders may also submit bid, however the successful bidders must get registered in appropriate class with appropriate authority before signing the contract.
Note :-
1. Amount of Bid Security should be taken as mentioned in the Bid Data Sheet of the Bidding Document.
2. Cost of Bid Document (Rs. 10000) and Bid Security (as mentioned in the Bid Data Sheet) shall be deposited online in form as mentioned in Bid Data Sheet failing which the bid will be treated non responsive and action shall be taken as per Sec. 2 of ITB clause 12.2 (d). Online payment through RTGS/ NEFT should not be made through SBI.
3. In case, it is found, even after the award of work that the bidder has submitted/ uploaded any false/erroneous/fraudulent statement/document, he/she is liable for blacklisting and forfeiture of Bid Security.
4. Bidders must submit GST registration certificate without which bid is liable to be rejected.
5. Bidders whose names appear in the Debar/blacklist of RWD, any department of GoJ/GoI (including JSRRDA) shall not be allowed to participate in the above bids.
6. Bids submitted by bidders, who have long pending ATR(s) / made inordinate delay in execution of earlier allotted construction/ maintenance works of PMGSY, may be rejected summarily.
7. In case of any discrepancy/dispute about units in BOQ, units as mentioned in Current SOR on which BOQ has been prepared shall prevail.
8. Participating bidders are free to submit grievances, if any, against the decision of technical evaluation within five working days from the date of uploading of decision of technical evaluation only through email at jh-ce@pmgsy.nic.in. Grievance submitted after stipulated period shall not be considered.
9. Bidders must have valid registration with Employee Provident Fund organization under EPF and Miscellaneous Provisions Act 1952 failing which the bid shall be rejected.
10. Bidders must not quote rate for routine maintenance. The amount for routine maintenance as indicated in the Bill of Quantities must be acceptable to bidders.
11. For unbalanced bids, extra security will be required to be deposited by the bidder by the time of Agreement.

All other details can be seen in the bidding document which is available in website **pmgsytendersjhr.gov.in** as per schedule mentioned above.

Chief Engineer
JSRRDA, Ranchi

PR 317642 Rural Work Department(23-24).D

PUBLIC NOTICE

NOTICE is given under instructions of my client **Mrs. Smita Gajanan Suryavanshi** owner of Flat No. 6, in Bldg. No. H-7, New Deonar Municipal CHS Ltd., at Deonar Municipal Colony, Govandi, Mumbai 400 043. My client states that in respect of said Flat she has lost/ misplaced:-
1) Original Allotment letter of first owner Shri. Mattar Krishna Nayak, and
2) Original Agreement dtd. 05/09/1986 between Shri. Mattar Krishna Nayak and Smt. Rohini Balkrishna Chalke.

All persons / authorities having any claim/s on aforesaid lost / misplaced documents or on said Flat are required to make the same known in writing to me with documentary evidences at my under mentioned office within 15 days from date of this publication, failing which it shall be presumed that there are no claims over the same. If any claim/s received after 15 days period hereof, same shall be considered as waived or given up.

ABHISHEK K. PAREKH
Advocate High Court
Shop No. 15 & 16, Jents Market, Near Chembur Rly. Station, Chembur, Mumbai - 400 071.

WEAVING THE MINDS OF MANKIND
Kallappanna Awade Ichalkaranji Janata Sahakari Bank Ltd.,
(Multi-State Scheduled Bank)
Head Office, Main Road, Ichalkaranji.

NOTICE TO CUSTOMERS

We hereby inform you that as per RBI directives,

1) Your account has been treated as dormant as no transactions have been made on your account in the last 24 months or more.
2) It is mandatory for every account holder in the bank to update **KYC** periodically.
3) Transactions have been suspended due to incomplete **KYC** on your account.

However, you are requested to the above any of reasons, if the transaction is suspended for the accountholder should immediately submit the latest/updated **KYC** documents at your nearest branch as mentioned below, so that the transactions on the account can continue on a regular basis. Bank has the right to close the account if the **KYC** is not fulfilled despite repeated notices to you.

Please provide your Mobile / E-mail ID to update your account details so that ensure the best banking services to all our customer.

Essential Documents for KYC:
1) Identity Proof, 2) Address Proof, 3) Two Photo

* **Identity Proof (Any One) :** Passport (of Valid period), Aadhar Card, PAN Card, Election Card, Govt./Defense Card, Driving License (of Valid period), Employee ID Card, NAREGA Card.
* **Address Proof (Any One) :** Voter ID Card, Driving License, Govt./Defense Card, Ration Card, Telephone Bill (Latest paid for bill), Bank Statement, LIC Policy, Aadhar Card, NAREGA Card.
* **Photo : Latest Two Copies.**

You are therefore, request to all the Customers / Account holders to comply with the KYC instructions given in this respect.

Chief Executive Officer

आमदार रोहित पवार यांची 'ईडी'कडून ९ तास चौकशी

मुंबई, दि. १ : प्रतिनिधी

शरद पवार यांचे नातू आणि कर्जत जामखेड मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांची गुरुवार, दि. १ फेब्रुवारी रोजी सत्तावसुली संचालनालयाने (ईडी) तब्बल नऊ तास चौकशी केली. कन्नड सहकारी साखर कारखान्याची लिलाव प्रक्रिया आणि बारामती ॲग्रोशी संबंधित व्यवहारांची कागदपत्रे 'ईडी'ने तपासली. याआधी दि. २४ जानेवारी रोजी ते 'ईडी' कार्यालयात चौकशीसाठी हजर राहिले होते. त्यावेळी त्यांची ११ तास चौकशी करण्यात आली होती.

कन्नड सहकारी साखर कारखाना आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्यानंतर त्याचा शिखर बँकेतर्फे लिलाव करण्यात आला. ५० कोटी रुपयांना 'बारामती ग्रोने' या कारखान्याची खरेदी केली. या लिलाव प्रक्रियेत सहभागी झालेल्या 'बारामती ग्रो', 'हायटेक इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन इंडिया लि.' आणि 'समृद्धी शुगर प्रा. लि.' या कंपन्यांमध्ये झालेले व्यवहार संशयास्पद असल्याचे 'ईडी'ला आढळून आले. त्यामुळे काही दिवसांपूर्वी 'बारामती ॲग्रो' या कंपनीशी संबंधित विविध ठिकाणांवर 'ईडी'ने धाडी टाकल्या होत्या. त्यानंतर आता या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आमदार रोहित पवार यांना नोटीस पाठवत चौकशीसाठी बोलावण्यात आले.

थोडक्यात

सीएसटी स्थानकातील ममता कक्षाकडे दुर्लक्ष

मुंबई : माता तसेच बालकांसाठी प्रवासादरम्यान होणारी गैरसोय टाळण्यासाठी मध्य रेल्वेवर ममता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

परंतु, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील 'ममता कक्ष' स्थानक परिसरातील आरक्षण केंद्राच्या बाहेर एका कोपऱ्यात पडून आहे. रेल्वे प्रशासनाकडून दुर्लक्षित करण्यात आलेला सदर कक्ष भविष्यात तसेच धूळ खात पडून राहणार आहे की योग्य ती उपाययोजना करून महिला आणि बालकांसाठी वापरण्याजोगे करणार आहे की नाही, असा प्रश्न महिला प्रवाशाकडून केला जात आहे.

मुंबईत ७० टक्के सर्वेक्षण पूर्ण

मुंबई : महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी सर्वेक्षणाला दि. २३ जानेवारीपासून सुरुवात झाली आहे. बुधवार, दि. ३१ जानेवारीपर्यंत २७ लाख, ४७ हजार, ६६९ घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्याची माहिती मुंबई महापालिकेने दिली. सर्वेक्षणाची जबाबदारी मुंबई महापालिकेच्या एकूण ९२ हजार कर्मचाऱ्यांपैकी ३० हजार कर्मचाऱ्यांवर देण्यात आली आहे. दि. २३ ते ३१ जानेवारीपर्यंत ३८ लाख, ६२ हजार, १९० पैकी एकूण २७ लाख, ४७ हजार, ६६९ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले. जवळपास ७० टक्के सर्वेक्षण पूर्ण झाले असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

प्रभाकर देवधर, रामकृष्ण नायक श्रद्धांजली सभा उद्या

मुंबई : मराठी विज्ञान परिषदेचे माजी अध्यक्ष आणि विश्वस्त प्रभाकर देवधर आणि मराठी विज्ञान परिषद गोवा विभागाचे संस्थापक रामकृष्ण नायक यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता शनिवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजता श्रद्धांजली सभेचे आयोजन केले आहे. ही सभा प्रत्यक्ष व ऑनलाईन अशी समांतररित्या होईल. मिटिंग आयडी: ८२४ ८९२० ९४३४ पासकोड ०८०७३७ अथवा लिंक https://us06web.zoom.us/j/82480929434?pwd=rxtMHL0Xelyj8uyvco8BbUcu2I4Nga.1). याबाबत अधिक माहितीसाठी संपर्क शीव–चुनाभट्टी येथील मराठी विज्ञान परिषद, विज्ञान भवन (मो. ९९६९१००९६१) येथे साधावा.

वडाळ्यातील राडारोडा; ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

मुंबई : मुंबई महापालिका प्रशासनाकडून देण्यात आलेल्या तक्रारीनुसार वडाळा येथील मोकळ्या मैदानामध्ये अनधिकृतपणे राडारोडा (डेब्रिज) टाकणाऱ्या पाच जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा नोंद करत याकामी वापरण्यात आलेले आठ डंपर आणि एक पोकलँड संयंत्र ताब्यात घेतले आहे. संबंधित वाहनाची नोंदणी रद्द करण्याबाबत परिवहन आयुक्तांना लेखी कळविण्याचे निर्देशही अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे यांनी दिले आहेत. उपआयुक्त (परिमंडळ २) स्माकांत बिरादार, साहाय्यक आयुक्त (एफ उत्तर विभाग) चक्रपाणी अल्ले यांच्या देखरेखीखाली पर्यवेक्षक (घनकचरा व्यवस्थापन) शरद जुवाटकर, सहायक अभियंता कैलास वाटेकर, भारत पाटील यांच्या पथकाने कार्यवाही केली. पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, मेहबुब पटेल, राजू केसबन नायडू, रामदास मोनू प्रसाद, मोहम्मद सलीम इब्राहत अली, उजैर अहमद मोहम्मद इसहार खान या वाहनचालकांविरोधात गुन्हा नोंद केला आहे.

प्लॉट्स व्यवहारातही महारेरा नोंदणी!

४१ प्रवर्तकांना 'महारेरा'ची कारणे दाखवा नोटीस

मुंबई, दि. १ : प्रतिनिधी

राज्यात महारेरा नोंदणीक्रमांकाशिवाय अनेक ठिकाणी प्लॉट्स पाडून मोठमोठ्या, जाहिराती देऊन प्लॉट्स विक्री होत असल्याचे महारेराच्या निदर्शनास आले आहे. ही बाब गंभीर असून महारेराने स्वाधिकारे (Suo Motu) या नियम उल्लंघनाची नोंद घेतली आहे. महारेरा नोंदणी क्रमांकाशिवाय जाहिराती करणाऱ्या राज्यातील सुमारे ४१ अशा प्रवर्तकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. प्लॉट्स पाडून प्लॉट विक्रीसाठीही महारेराची नोंदणी असणे बंधनकारक आहे.

महारेराची मुख्यालयासह पुणे आणि नागपूर येथे क्षेत्रीय कार्यालये आहेत. कामकाजांच्या संनियंत्रणासाठी मुंबई महाप्रदेश आणि कोकणाचा समावेश कोकण म्हणजे मुख्यालयात, प. महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्राचा समावेश पुण्यात आणि विदर्भ, मराठवाडा नागपूर कडे येतो. महारेरा नोंदणीक्रमांकाशिवाय जाहिराती छापणाऱ्या ४१ प्रकल्पांपैकी सर्वात जास्त २१ पुणे क्षेत्रातील असून कोकण क्षेत्रातील १३ आणि नागपूर क्षेत्रातील सात प्रकल्पांचा यात समावेश आहे.

स्थावर संपदा (विनियमन व विकास) कायदा २०१६मधील 'कलम ३'नुसार भूखंड (प्लॉट), सदनिका किंवा इमारतीच्या विक्रीसाठी काही अटींसापेक्ष महारेराची नोंदणी अत्यावश्यक आहे. त्याशिवाय

प्रवर्तकांना भूखंड, सदनिका किंवा इमारतींच्या विक्रीसाठी जाहिरात करता येत नाही. शहरी भागात महारेरा नोंदणीशिवाय प्लॉट विक्रीचे प्रमाण नगण्य असून शहरा जवळच्या विकसनशील भागात आणि ग्रामीण भागात अशा प्रकल्पांचे प्रमाण जास्त आहे. अशा प्लॉट्सच्या प्रकल्पांना नोंदणीक्रमांक देताना महारेरा इमारतींच्या प्रकल्पांबाबत जशी काळजी घेते तशीच काळजी घेते. यातही आर्थिक, कायदेशीर आणि तांत्रिक अशी त्रिस्तरीय पातळीवर छाननी केली जाते. यात स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून संबंधित प्रस्तावित प्रकल्पाला मिळालेली मंजुरी प्रवर्तकाला सादर करावी लागते. स्थानिक प्राधिकरण त्या प्रकल्पाच्या बिन–शेती प्रमाणपत्राशिवाय (एनए) मालकी, भूखंडाचा आकार, एकूण भूखंडाच्या आणि प्लॉटच्या सीमारेषा याबाबी पाहतेच. याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देताना जशा पाणीपुरवठा, रस्ते, मलनिस्सारण, सार्वजनिक सोईसुविधा अशा नागरी सुविधा अत्यावश्यक असतात त्याच धर्तीवर या प्रकल्पांनाही या सर्व सोईसुविधांची तरतूद करावी लागते, दाखवावी लागते. महारेरा काटेकोर छाननी करून या सर्व बाबींची खात्री करून घेतल्याशिवाय नोंदणीक्रमांक देत नाही.

प्रकल्प महारेराकडे नोंदणीकृत असेल, तर प्रवर्तकांना स्थावर संपदा कायद्यानुसार ग्राहकहिताच्या दृष्टीने अनेक बाबी कराव्या लागतात. दिलेल्या हमींची पूर्ण पूर्तता करावीच लागते. नोंदणीक्रमांक देताना महारेरा या सर्व बाबींची खात्री करून घेते. म्हणून स्वहितास्तव महारेराकडे नोंदणीकृत नसलेल्या अशा प्लॉट्सच्या प्रकल्पातून फसवणूक होऊ नये, यासाठी प्लॉट घेण्याचे टाळावे, असे आवाहन महारेराने केले आहे.

महारेराची ठाम भूमिका



"प्लॉट, सदनिका आणि इमारतींच्या विक्रीसाठी जाहिरात करण्यापूर्वी महारेरा नोंदणीक्रमांक घेणे अत्यावश्यक आहे, असे असूनही प्लॉट्सच्या प्रकल्पासाठी महारेरा नोंदणीक्रमांक न घेताच जाहिरात करणे हे कायद्याचे उल्लंघन तर आहेच शिवाय गुंतवणूकदारांच्या हक्कांवर गदा आणणारेही आहे. स्थावर संपदा क्षेत्रातील अशा प्रकारची अनियमितता खपवून घ्यायची नाही, याबाबत महारेरा ठाम आहे. ही कारवाई याच प्रक्रियेचा भाग आहे.

– अजोय मेहता, अध्यक्ष, महारेरा

राज्य सरकारचे १२ वर्षे मुदतीचे २५०० कोटींचे रोखे विक्रीस

मुंबई, दि.१ : प्रतिनिधी

१२ वर्षे मुदतीचे २ हजार, ५०० कोटी रुपये किमतीच्या शासकीय रोख्यांची विक्री अटी आणि शर्तीच्या अधीन राहून लिलावाने करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. (वित्तीय सुधारणा) यांनी दिली.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणूकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल. मंगळवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी 'भारतीय रिझर्व्ह बँक'तर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल, तर लिलावाचे बीडस् संगणकीय प्रणालीनुसार, 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया', 'कोअर बँकिंग सोल्यूशन', (ई–कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारा ई–कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बिड्स् ई–कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. कर्जरोख्याचा कालावधी १२ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी बुधवार, दि. ७ फेब्रुवारीपासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दि. ७ फेब्रुवारी, २०३६ रोजी पूर्ण किंमतीने केली जाईल.

लिलावाचा निकाल 'रिझर्व्ह बँके'च्या संकेतस्थळावर

लिलावाचा निकाल 'भारतीय रिझर्व्ह बँके'च्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान बुधवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया', मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

ठाणे, मुलुंड दरम्यान उद्या रात्री 'ट्रॅफिक ब्लॉक'

मुंबई, दि. १ : प्रातिनिधी

ठाणे आणि मुलुंड स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावरील मुलुंड स्थानकावरील जुने पादचारी पूल (एफओबी) काढून टाकण्यासाठी मध्य रेल्वेतर्फे ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात आला आहे. शनिवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी रात्री ११.३० ते रविवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी पहाटे ४.३० वाजेपर्यंत पाच तासांचा तणे आणि मुलुंडदरम्यान अप आणि डाऊन जलद रेल्वेमार्गावर 'ट्रॅफिक ब्लॉक' घेण्यात येणार आहे. यामुळे उपनगरीय तसेच लांब पल्ल्याच्या गाड्यांवर परिणाम होणार आहे. खोपोली केपी १७ साठी डाऊन जलद मार्गावरील उपनगरीय गाडी विद्याविहार आणि दिवा स्थानकांदरम्यान डाऊन धीम्या मार्गावर वळवण्यात येईल. तसेच के १२९ कल्याण लोकल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (छशिमट) येथून रात्री ९.५४ वाजता सुटणारी व के १४० छशिमट लोकल कल्याण येथून रात्री ११.०५ वाजता सुटणारी उपनगरीय गाडी रद्द करण्यात आली आहे. शिवाय लांब पल्ल्याच्या मेल/एक्सप्रेस काही गाड्या अन्य मार्गांवरून वळवण्यात आल्या आहेत.

मराठा आरक्षण प्रश्नी याचिकेवर मंगळवारी सुनावणी

मुंबई : मराठा समाजाला इतर मागासवर्ग प्रवर्गातून (ओबीसी) कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने दि. २६ जानेवारी रोजी काढलेल्या अधिसूचनेला 'ओबीसी वेल्फेअर फाउंडेशन'ने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. ही याचिका न्यायालयाने स्वीकारली असून, मंगळवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी सुनावणी त्वरित सुनावणी होणार आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याची परवानगी देणाऱ्या २००४ पासूनच्या सरकारच्या वेगवेगळ्या निर्णयांना या याचिकेद्वारे उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. त्याशिवाय मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या न्यायमूर्ती (निवृत्त) संदीप शिंदे समितीच्या स्थापनेला व समितीने सरकारला सादर केलेल्या अहवालालाही या याचिकेद्वारे उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

'म्हाडा' संक्रमण शिबिरातील नागरिकांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण

मुंबई, दि.१ : प्रतिनिधी

'म्हाडा'च्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील संक्रमण गाळ्यांमध्ये वास्तव्यास असलेल्या भाडेकरूंचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करून त्यांच्या वास्तव्याची प्रमाणता निश्चिती करण्याची जबाबदारी राज्य शासनाने नुकतीच एका अधिसूचनेद्वारे 'म्हाडा'च्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सोपविली आहे.



मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरांतील गाळ्यांमध्ये वास्तव्यास असलेल्या भाडेकरूंची आधारकार्डमध्ये नोंद असलेली माहिती तसेच ई–केवायसी अधिप्रमाण सुविधेचा वापर करून बायोमेट्रिक सर्वेक्षणाच्या आधारे मंडळातर्फे पडताळणी करण्यात येणार आहे. या आधारे संक्रमण शिबिरातील भाडेकरूंच्या वास्तव्याची प्रमाणता अधिकृत किंवा अनधिकृत असल्याची निश्चिती मंडळातर्फे करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागातर्फे यासंदर्भात नुकतीच अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. केंद्र शासनाने सुशासनासाठी आधार अधिप्रमाणन नियम, २०२० अन्वये पडताळणी करण्याच्या उद्देशाने स्वेच्छा तत्वावर सदर जबाबदारी मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सोपविली आहे.

अधिसूचनेमुळे सर्वेक्षण प्रक्रिया वेगवान

महाराष्ट्र शासनाच्या दि. १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील संक्रमण शिबिरातील अनधिकृत रहिवाशांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचार करून त्यांचे 'अ' 'ब' 'क' प्रमाणे प्रवर्ग करण्यात आले आहेत. 'अ' प्रवर्गात मूळ रहिवासी यांना संक्रमण शिबिरामध्ये स्थानांतरण करण्यात आलेले आहे. 'ब' प्रवर्गात अशा प्रकारचे रहिवाशी ज्यांनी मुखत्यार पत्र किंवा तत्सम प्राधिकार पत्राद्वारे मूळ रहिवाशांकडून संक्रमण शिबिरातील गाळ्यांचा हक्क घेतला आहे, तसेच 'क' अशा प्रकारचे घुसखोर रहिवाशी ज्यांनी 'म्हाडा'च्या संक्रमण शिबिरातील गाळ्यांचा अनधिकृतपणे ताबा घेतला आहे. यानुसार मंडळातर्फे सर्वेक्षणाची कार्यवाही सुरू आहे. सदरील शासन अधिसूचनेमुळे मंडळाच्या सर्वेक्षण प्रक्रियेलादेखील वेग मिळणार आहे.

मरीन लाईन्स पुलाजवळ काचेच्या उद्वाहक

मुंबई : मरीन लाईन्स सार्वजनिक पुलाजवळ दोही बाजूंना काचेच्या उद्वाहक बसवण्याचा निर्णय मुंबई महापालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार सुरक्षा यंत्रणेसह सहा मीटर आणि नऊ मीटर उंचीची १५ प्रवासी क्षमतेच्या काचेच्या उद्वाहकांसाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. सदर पादचारी पुलावर ये–जा करण्यासाठी गरोदर महिला, ज्येष्ठ नागरिकांनात्रास सहन करावा लागत होता. त्याचप्रमाणे येथील रस्ता ओलांडताना अपघाताची दाट शक्यता लक्षात घेत पुलावर उद्वाहक बसवण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक करत होते.

मुंबईत आजपासून राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धा

मुंबई : औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७ वी आणि महिलांची २२ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा शुक्रवार, दि. २ ते ५ फेब्रुवारीदरम्यान प्रभादेवीतील कामगार क्रीडा भवन येथे होत आहे. स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार, दि. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता होणार आहे. यावेळी कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे, शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहुल शेवाळे, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) डॉ. रविंद्रकुमार सिंगल, विकास आयुक्त (असंघटित कामगार) डॉ. एच.पी.तुम्मोड, कामगार आयुक्त सतीश देशमुख, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

TENDER NOTICE

Sealed quotations from firms are invited **for supply of 10 Security Cabins** in phased manner for ***Kurla Kamgar CHSL***, S.G. Barve Marg, Kurla (East), Mumbai-400024. Sealed quotations with financial bids along with Annexure 'A' filled in the specified proforma and addressed to the Kurla Kamgar Co-Operative Housing Society Ltd. S.G. Barve Marg, Kurla east, Mumbai-400024 should reach latest by 6:00 PM on 08/02/2024. Quotations received after the stipulated date and time will not be entertained. The top of envelop should be clearly superscribed "Tender for security cabin". Specified proforma alongwith all terms and conditions may be collected from The Kurla Kamgar Co-Operative Housing Society office (Except Sunday) from 02/02/2024 between 10:30 am to 7:00 pm by paying Rs.500/- (Rupees Five Hundred Cash /ECS, non-refundable).
Quotation shall be opened in society's office on 09/02/2024 at 7:30 pm by the committee. The Kurla Kamgar Co-Operative Housing Society Ltd reserves the rights to reject any or all the quotations without assigning any reason.

Secretary
The Kurla Kamgar CHSL

अशोक फळणीकर सेवानिवृत्त

मुंबई : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) संचालक (वित्त) अशोक फळणीकर हे बुधवार, दि. ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्यावतीने महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी संचालक (संचलन) संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) सुनील सूर्यवंशी, संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) संतोष आंबेरकर, मुख्य अभियंता पीयूष शर्मा, सुनील शेरेकर, श्रीमती जुईली वाघ आदीसह अन्य अधिकारी उपस्थित होते.



JOY REALTY LIMITED
CIN:L65910MH1983PLC031236
REGD. OFF : Plot 239-5 Floor-GRD, 239 Yusuf Palace, Lady Jamshedji Road, Shivaji Park, Mahim, Mumbai, Maharashtra, India, Pin - 400016. Tel : 022-6748 6888.
E-mail: joyrealty@joyrealestate.com ; cs@joyrealestate.com
Website: https://www.joyrealty.in/organisation.aspx

CORRIGENDUM TO THE EXTRAORDINARY GENERAL MEETING NOTICE DATED 12TH JANUARY, 2024

The Company had issued Notice dated 12th January, 2024 for seeking approval of members for certain agenda items through Extraordinary General Meeting to be held on 3rd February 2024. The Notice has already been circulated to all the Shareholders of the Company in due compliance with the provisions of the Companies Act, 2013 read with rules made thereunder and applicable provisions of SEBI regulations

The Company through this corrigendum ("Corrigendum") wishes to bring to the notice of the Shareholders, addition to the said notice in terms of the Listing Regulations.

This Corrigendum to the Notice of the Extra-Ordinary General Meeting shall form an integral part of the Notice of Extra-Ordinary General Meeting which has already been circulated to shareholders of Company and on and from the date hereof, the Notice of Extra-Ordinary General Meeting shall always be read in conjunction with this Corrigendum. This corrigendum will also be made available on website of the stock exchange i.e BSE Limited www.bseindia.com, Metropolitan Stock Exchange at https://www.msei.in/ and on the website of the Company on https://www.joyrealty.in/ All other contents of the Notice of Extra-Ordinary General Meeting, save and except as modified or supplemented by the Corrigendum, shall remain unchanged

Please note: Shareholders who have not voted are requested to vote by logging in on www.evoting.nsdl.com. However, Shareholders who have already voted before the issue of this corrigendum notice, have the option to give their assent or dissent by sending an email to the Scrutinizer on below address: Samdanikdan@gmail.com

By Order of the Board of Directors
For Joy Realty Limited
Sd/-
POOJAN KEYURBHAI MEHTA
Director & CFO - DIN: 07800003

Date: 01/02/2024
Place: Mumbai

विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञानही आवश्यक

मंत्री चंद्रकांतदादा पाटील; एसएनडीटी महिला विद्यापीठाद्वारे परिसंवाद

मुंबई, दि.१ : प्रतिनिधी

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजून घेणे अवघड आहे आणि जर ते समजले नाही, तर त्याची अंमलबजावणी करणे अधिक कठीण आहे. मात्र, सध्याच्या युगात विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञानही आवश्यक आहे," असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. तसेच २०२३–२४ या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी न केल्यास महाविद्यालयांची मान्यता रद्द होऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ ("एसएनडीटी") अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांनी संस्कृती शिक्षा उत्थान न्यास आणि भारतीय शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: आव्हाने, उपाय आणि पुढील वाटचाल' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते गुरुवार, दि. १ फेब्रुवारी रोजी सर विठ्ठलदास ठाकरसी विद्याविहार, जुहू आवार येथे या परिसंवादाचे उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. राज्याच्या

उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्यासह राज्यातील २२ विद्यापीठांचे कुलगुरू, ५१ खासगी विद्यापीठांचे कुलगुरू, त्यांचे व्यवस्थापकीय प्रतिनिधी आणि महाराष्ट्र शासनामार्फत गठीत करण्यात आलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सुकाणू समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते. सुकाणू समितीचे सदस्य प्रा. अनिल राव यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे परिवर्तनवादी तत्वज्ञान आहे आणि ज्यांना तत्वज्ञान समजत नाही ते चौकट आणि संरचनेच्या समस्यांमध्ये अडकत आहेत असे सांगितले. राज्यातील ११०० पदव्युत्तर महाविद्यालये, ३५५ पॉलिटेक्निक आणि ५५ स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण श्रेयांक (क्रेडिट) संरचना लागू करण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

भारत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था

"भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे. या टप्प्यावर भारताला महिला उद्योजक, स्टार्टअप प्रवर्तक, महिला व्यावसायिक नेते आणि संपत्ती निर्माण करणाऱ्यांची गरज आहे. त्यामुळे महिलांसाठी उपलब्ध असलेल्या योजनांबद्दल अधिक माहिती देण्यासाठी आणि शिक्षित करण्यासाठी एसएनडीटी महिला विद्यापीठाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

– रमेश बैस, राज्यपाल

समाज बदलण्याच्या संभाव्यतेचा उपयोग व्हावा



"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये समाज बदलण्याच्या संभाव्यतेचा पुरेपूर उपयोग व्हावा. एसएनडीटी महिला विद्यापीठाने यात पुढाकार घेतला आहे. आजच्या कार्यक्रमातून महाराष्ट्र सरकाने आपापल्याला विद्यापीठांद्वारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशी आणि कुठवर केलेली आहे, याचा आढावा घेण्यात आला. आतापर्यंत अनेक कॉलेजमध्ये हे धोरण लागू करण्यात आले असून २०२४–२५ मध्ये राहिलेल्या सगळ्या अभ्यासक्रमांमध्ये हे धोरण लागू करण्यात येणार आहे.

– डॉ. उज्वला चक्रदेव,
कुलगुरु, एसएनडीटी महिला विद्यापीठ

बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, एफ/दक्षिण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, परळ, मुंबई–४०००१२. कि.फि.अ./एफ/दक्षिण/१११६/ दुरुस्ती, दिनांक :– ३१.०१.२४

सूचनापत्र

किटक नियंत्रण अधिकारी, एफ/दक्षिण विभाग येथे बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणीकरिता एप्रिल ते ऑक्टोबर २०२४ (१६३ दिवस) या कालावधीसाठी ३२ स्वयंसेवक उपलब्ध करुन घेण्यासाठी नोंदणीकृत सहकारी/बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांचेकडून अर्ज मागविण्याबाबत संकेतस्थळावर सूचनापत्र देण्यात येत आहे.

इच्छुक संस्थांनी याबाबतचा तपशील अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर अथवा किटक नियंत्रण अधिकारी, एफ/दक्षिण विभाग कार्यालय (बृहन्मुंबई महानगरपालिका एफ/दक्षिण विभाग कार्यालय, किटक नियंत्रण अधिकारी, रु. नं. १. परळ. मुंबई–४०० ०१२), येथे संपर्क साधावा.

संस्थेने कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी किटक नियंत्रण अधिकारी, एफ/दक्षिण विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दिनांक १२.०२.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत.

सही/–
सहाय्यक आयुक्त
एफ/दक्षिण विभाग

पीआरओ/२७३०/जाहि./२०२३–२४
स्वमर्जीने औषधोपचार करू नका